सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

# नागरिकांची सनद

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

## आयोगाची संरचना

**मा. राज्य निवडणूक आयुक्त**

**मा. अपर मुख्य सचिव**

**१)** उप सचिव

**२)** उपायुक्त

**३)** सहायक आयुक्त -२

**४)** अवर सचिव -३

**५)** विधि अधिकारी

**६)** लेखा अधिकारी

**७)** माहिती व जनसंपर्क अधिकारी

**८)** सांख्यिकी अधिकारी

**९)** कक्ष अधिकारी तथा मा. आयुक्त तसेच अपर मुख्य सचिव यांचे प्रशासनिक अधिकारी

**१०)**कक्ष अधिकारी (कार्या-२, आस्थापना)

**११)निवडणूक कार्यासनेः-**

**अ)क**क्ष अधिकारी (कार्या-५,महानगरपालिका निवडणूक)

**ब)** कक्ष अधिकारी (कार्या-६, नगर परिषद/नगर पंचायत निवडणूक)

**क)**तहसिलदार (कार्या-७, जिल्हा परिषद/पंचायत समिती निवडणूक )

**ड)**तहसिलदार (कार्या-८, ग्रामपंचायत निवडणूक)

## प्रस्तावना व राज्य निवडणूक आयोगाची रचना

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए च्या तरतुदीनुसार दिनांक- २३ एप्रिल, १९९४ पासून राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र ची स्थापना करण्यात आली आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भयमुक्त व न्याय्य वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या नियुक्तीसंदर्भात राज्य निवडणूक आयुक्त (अर्हता व नियुक्ती) अधिनियम, १९९४ (१९९४ चा महा.२२) यात तरतूदी करण्यात आल्या आहेत. राज्य निवडणूक आयोग हा राज्य निवडणूक आयुक्त प्रमुख असलेला एक व्यक्ती आयोग आहे. राज्य निवडणूक आयुक्त (अर्हता व नियुक्ती) अधिनियम, १९९४ यामधील कलम १० मध्ये राज्य निवडणूक आयुक्तांच्या अन्य सेवा शर्ती महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या सदस्यांप्रमाणे असतील अशी तरतूद आहे. तसेच प्रशासकीय न्यायाधिकरण अधिनियम, १९८५ मधील कलम ८(३) मध्ये अध्यक्ष व सदस्यांच्या सेवा शर्ती या उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना लागू असलेल्या सेवाशर्तीप्रमाणे असतील, अशी तरतूद आहे. अधिनियमातील उपरोक्त तरतुदी विचारात घेता राज्य निवडणूक आयुक्त पदाचा दर्जा उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांशी समकक्ष आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकरिता सचिवांचे एक पद मंजूर असून त्या पदी भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येते. (सध्या या पदावर अपर मुख्य सचिव कार्यरत आहेत.) त्यांच्याकडे आयोगाच्या कामकाजाचे सुसूत्रीकरण व नियंत्रण करण्याची जबाबदारी सोपविलेली आहे.

## नागरिकांना हमी

राज्य निवडणूक आयोगाकडे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था जसे महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या निवडणुका भयमुक्त व न्याय्य वातावरणात पार पाडण्याची सांविधानिक जबाबदारी सोपविण्यात आली आहे. नागरिकांना सौजन्यपूर्वक वागणूक व मतदारांना सर्वतोपरी मदत करण्यासाठी आयोग कटीबध्द आहे.

## कार्यपूर्तीचे वेळापत्रक

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मुदती संपण्यापूर्वी सार्वत्रिक निवडणुका घेऊन नवीन स्थानिक स्वराज्य संस्था वेळेत कार्यरत व्हावी, यासाठी राज्य निवडणूक आयोग कार्यपूर्तीचे वेळापत्रक आखून देते. स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत दर पाच वर्षांनी संपते. सदर मुदत संपण्यापूर्वी तेथील सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण करण्याचे घटनात्मक बंधन राज्य निवडणूक आयोगावर आहे. याखेरीज जेथे जेथे पदे रिक्त होतील त्या पदांच्या पोटनिवडणुकांचा कार्यक्रमही आयोगामार्फत देण्यात येतो.

आयोगातील दैनंदिन प्रशासकीय कामासाठी व जनतेच्या अर्ज / कामासाठी कालमर्यादा "महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील प्रकरण क्र. ३ च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरुन तात्काळ नस्ती एका दिवसात किंवा दुसऱ्या दिवशी आणि तातडीच्या स्वरूपाची नस्ती ४ दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागांशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसांच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्यांच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल" याप्रमाणे लागू राहील.

# आयोगाची कार्ये

## ❖ विशिष्ट कार्ये

महानगरपालिका/नगर परिषदा/नगर पंचायती/जिल्हा परिषदा/पंचायत समित्या /ग्रामपंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भयमुक्त व न्याय्य वातावरणामध्ये घेणे.

## ❖ आयोगाचे ध्येय/धोरण

निवडणुकांसंबधी सर्व जबाबदारी व कर्तव्ये पार पाडणे.

## ❖ मंजूर आकृतीबंध

एकूण ८२ अधिकारी/कर्मचारी

## ❖ कार्य

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेणे

## ❖ कामाचे विस्तृत स्वरूप

निवडणुका घ्यावयाच्या नगरपालिका /नगर पंचायती /जिल्हा परिषद /पंचायत समित्या / ग्रामपंचायती यांची यादी तयार करणे, रिक्त पदांच्या पोटनिवडणुका, सार्वत्रिक निवडणुका विहित मुदतीत पार पाडणे.

## ❖ कार्यालयीन कामाची वेळ

सकाळी ९.४५ ते सायंकाळी ५.३०

## ❖ मालमत्तेचा तपशील

निरंक

## ❖ उपलब्ध सेवा

राजकीय पक्ष नोंदणी

## आयोगाच्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी

| अ.क्र. | पदनाम | जबाबदारी |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव | अपर मुख्य सचिव यांना राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयापुरते प्रशासकीय विभाग प्रमुख म्हणून घोषित करण्यात आले आहे. शासनाच्या विविध वित्तविषयक तसेच सेवाविषयक नियमान्वये शासनाच्या मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना जे अधिकार प्रदान केलेले आहेत ते अधिकार राज्य निवडणूक आयोगाच्या अपर मुख्य सचिवांना आहेत. त्यांच्याकडे आयोगाच्या कामकाजाचे सुसूत्रीकरण व नियंत्रण करण्याची जबाबदारी आहे. |
| २ | उप सचिव | १.आस्थापना व भांडार शाखा, रोख शाखा, संगणक व सांख्यिकी शाखा, ग्रंथालय व माहिती व जनसंपर्क शाखा, राजकीय पक्ष नोंदणी शाखा व कार्यास-नांचे पर्यवेक्षीय अधिकारी<br>२.माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खालील अपिलीय अधिकारी म्हणनू काम पाहणे. |
| ३ | उप आयुक्त | महानगरपालिका, नगर परिषदा, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत व विधि शाखा या कार्यासनाचे पर्यवेक्षीय अधिकारी |
| ४ | अवर सचिव १ | राज्यातील महानगरपालिका, नगर परिषदा, जिल्हा परिषद /पंचायत समिती निवडणुका वेळेवर व मुदतीत घेण्यासाठी निवडणुकांचे कार्यक्रम तयार करुन मंजूर करून घेण्याची जबाबदारी सोपविलेली आहे. |
| ५ | अवर सचिव - २ | १. आस्थापना संबंधित बाबी हाताळणे. |
| ६. | अवर सचिव-३ | १. संगणक शाखा, सांख्यिकी शाखा व राजकीय पक्ष नोंदणीचे काम पाहणे.<br>२. जन माहिती अधिकारी म्हणून काम पाहणे. |
| ७. | विधि अधिकारी | १.न्यायालयीन प्रकरणे हाताळणे<br>२. राजकीय पक्ष व आघाडयांच्या नोंदणीबाबतच्या कामांवर देखरेख ठेवणे. |
| ८ | सहायक आयुक्त | १. राज्यातील महानगरपालिका निवडणुका वेळेवर व मुदतीत घेण्यासाठी निवडणुकांचा कार्यक्रम तयार करुन मंजूर करुन घेण्याची जबाबदारी सोपविलेली आहे.<br>२. राज्यातील पंचायत समिती, जिल्हा परिषदांच्या निवडणूका वेळेवर व मुदतीत घेण्यासाठी निवडणुकांचे कार्यक्रम तयार करुन मंजूर करुन घेण्याची जबाबदारी सोपविलेली आहे.<br>३. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसंदर्भात निवडणूक यंत्रणेशी पत्रव्यवहार करणे व निवडणूक यंत्रणेकडून प्राप्त झालेल्या पत्रव्यवहारांवर निर्णय घेऊन उत्तर देणे.<br>४.नगर परिषद निवडणुका वेळेवर व मुदतीत घेण्यासाठी निवडणुकांचे कार्यक्रम तयार करुन मंजूर करुन घेण्याची जबाबदारी सोपविलेली आहे. |
| ९. | सहायक आयुक्त | १. जन माहिती अधिकारी<br>२. ग्रंथालय, माहिती व जनसंपर्क शाखा यांच्याकडील काम पाहणे. |

| | | |
|---|---|---|
| १०. | तहसिलदार-१ | राज्यातील ग्रामपंचायतींच्या निवडणुका वेळेवर व मुदतीत घेण्यासाठी निवडणुकांचे कार्यक्रम तयार करुन मंजूर करुन घेण्याची जबाबदारी सोपविलेली आहे. |
| ११. | तहसिलदार-२ | जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांचे काम. |
| १२. | कक्ष अधिकारी-१ | मा. आयुक्त तसेच अपर मुख्य सचिव यांचे प्रशासनिक अधिकारी |
| १३. | कक्ष अधिकारी-२ | आस्थापना व प्रशासनविषयक बाबी हाताळणे |
| १४. | कक्ष अधिकारी-३ | महानगरपालिका निवडणूकांचे काम |
| १५. | कक्ष अधिकारी-४ | नगर परिषद/नगरपंचायतींच्या निवडणुकीचे काम |
| १६. | लेखा अधिकारी | १.लेखाविषयक कामे हाताळणे<br>२.आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहणे |
| १७. | सांख्यिकी अधिकारी | सांख्यिकीविषयक काम, राजकीय पक्षांची नोंदणी तसेच संगणक शाखेचे काम पाहणे |
| १८. | माहिती व जनसंपर्क अधिकारी | निवडणुकीच्या कार्यक्रमाला प्रसिध्दी देणे, पत्रकार परिषदा आयोजित करणे इत्यादी |
| १९. | स्वीय सहायक | मा. आयुक्त व अपर मुख्य सचिव यांच्याकडे येणाऱ्या नस्तींची नोंद घेणे, दूरध्वनी नोंदवही ठेवणे तसेच श्रृतलेखन व टंकलेखनाचे काम करणे |
| २०. | सहायक/नायब तहसिलदार | टिप्पणी लेखन व अन्य कामे करणे |
| २१. | लघुलेखक | श्रुतलेखन व टंकलेखनाचे काम करणे |
| २२. | उप लेखापाल | रोख शाखेतील लेखाविषयक कामे करणे |
| २३. | ग्रंथपाल | ग्रंथालय अद्ययावत ठेवणे, जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणे, राजकीय पक्षांच्या नोंदणीविषयक कामे करणे |
| २४. | अनुवादक | भाषांतर करणे |
| २५. | सांख्यिकी सहायक | सांख्यिकीविषयक माहिती गोळा करणे |
| २६. | रोखपाल | रोख / धनादेश संबंधित बाबी हाताळणे, रोख वही अद्ययावत ठेवणे |
| २७. | लिपिक-टंकलेखक | पदास अनुसरुन सर्व कामे |
| २८. | संगणक चालक | संगणकाशी संबंधित कामे |
| २९. | वाहन चालक | आयोगातील अधिकाऱ्यांची वाहने चालविणे |
| ३०. | नाईक/रोनिओ ऑपरेटर/झेरॉक्स ऑपरेटर/शिपाई | पदास अनुसरुन सर्व कामे |

- ❖ वरील सर्व कामे /जबाबदाऱ्या नेमून दिलेल्या अधिकारी/कर्मचारी यांनी न केल्यास त्यांची तक्रार किंवा माहिती उप सचिव/उपायुक्त, राज्य निवडणूक आयोग यांच्याकडे करावी.
- ❖ उप सचिव/उपायुक्त यांच्या पातळीवरील काम न झाल्यास/विलंब झाल्यास, त्याची तक्रार मा. अपर मुख्य सचिव, राज्य निवडणूक आयोग यांच्याकडे करावी.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंबंधित अधिनियम व नियम

| अ.क्र. | विषय | संबंधित शासन निर्णय/कार्यालयीन आदेश/नियम/राजपत्र वगैरेचा क्रमांक व दिनांक |
|---|---|---|
| १. | महानगरपालिका निवडणूक | १. मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८<br>बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक नियम, २००६<br>२. नागपूर महानगरपालिका अधिनियम, १९४८<br>या अधिनियमांतर्गत अधिसूचना क्रमांक-एनएमसी-२३०/१९६५/एन-तेरा,<br>दिनांक-१५ जानेवारी, १९५२ रोजी प्रसिध्द केलेले निवडणूक नियम<br>३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९<br>अधिनियमांतर्गत अनुसूची-ड मधील निवडणूक नियम |
| २. | नगर परिषद/नगरपंचायती निवडणुका | १. महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५<br>२. महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती निवडणूक नियम, १९६६ |
| ३. | जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक | १) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१<br>२) महाराष्ट्र जिल्हा परिषदा (मतदार विभाग आणि निवडणूक घेणे) नियम, १९६२<br>३) महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण आणि निवडणूक घेणे)नियम, १९६२<br>४) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (जागांचे आरक्षण ठरविण्याची व<br>चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, १९९६ |
| ४. | ग्रामपंचायत निवडणूक | १) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई अधिनियम क्र.३)<br>२) मुंबई ग्रामपंचायत (गावाचे प्रभागात विभाजन करणे आणि स्त्रिया, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी जागा राखून ठेवणे) नियम, १९६६<br>३) महाराष्ट्र ग्रामपंचायत (निवडणूक) नियम, १९५९ |

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ खालील अपिलीय प्राधिकारी, जन माहिती अधिकारी, सहायक जन माहिती अधिकारी यांची यादी

| अ.क्र. | पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | उप सचिव/<br>उपायुक्त (का-१०) | अपिलीय प्राधिकारी |
| २ | अवर सचिव/<br>सहायक आयुक्त(का-१०) | जन माहिती अधिकारी |
| ३ | कक्ष अधिकारी | सहायक जन माहिती अधिकारी, (का-१)<br>मा.आयुक्त तसेच अपर मुख्य सचिव यांचे प्रशासनिक अधिकारी |
| ४ | कक्ष अधिकारी | सहायक जन माहिती अधिकारी, (का-२)आस्थापना शाखा |
| ५ | लेखा अधिकारी | सहायक जन माहिती अधिकारी, (का-३) रोख शाखा |
| ६ | सांख्यिकी अधिकारी | सहायक जन माहिती अधिकारी, (का-४)सांख्यिकी शाखा |
| ७ | कक्ष अधिकारी | सहायक जन माहिती अधिकारी, (का-५)महानगरपालिका निवडणूक |
| ८ | कक्ष अधिकारी | सहायक जन माहिती अधिकारी, (का-६) नगर परिषद निवडणूक |
| ९ | तहसिलदार | सहायक जन माहिती अधिकारी, (का-७)जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक तसेच मा.आयुक्तांचे प्रशासनिक अधिकारी |
| १० | तहसिलदार | सहायक जन माहिती अधिकारी, (का-८)ग्रामपंचायत निवडणूक |
| ११ | विधि अधिकारी/<br>सहायक आयुक्त | सहायक जन माहिती अधिकारी, (का-९) जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, नगर परिषदा व महानगरपालिका निवडणुका यांची न्यायालयीन प्रकरणे |
| १२ | माहिती व जनसंपर्क अधिकारी | सहायक जन माहिती अधिकारी, (का-१०) जनसंपर्क अधिकारी |
| १३ | कक्ष अधिकारी/सांख्यिकी अधिकारी | सहायक जन माहिती अधिकारी, (का-११)पक्ष नोंदणी व संगणक शाखा |

## गाऱ्हाणी / तक्रारी यांचे निराकरण

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात काही गाऱ्हाणी असल्यास, नागरिकांना राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रार करता येते. गाऱ्हाणी समक्ष भेटीत / खालील पत्त्यावर पत्राने किंवा ई-मेलद्वारेही मांडता येतील.

**पत्ता:- राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**नवीन प्रशासन भवन, पहिला मजला, मादाम कामा रोड,**
**हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई:- ४०० ०३२.**

**ई-मेल : stateelectioncommission@gmail.com**
**संकेत स्थळ :**www.mahasec.com

## नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन

या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा किंवा परिणामकारकतेचा आढावा राज्य निवडणूक आयोगाकडून दरवर्षी घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील.

## जनसामान्यांकडून सूचना

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमूल्य सूचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करून त्यात वेळोवेळी सुधारणा करण्यात येतील.

## दृष्टीक्षेप

| अ.क्र. | विभाग | जिल्हयांची संख्या | महानगरपालिका | नगर परिषदा | नगर पंचायती | जिल्हा परिषदा | पंचायत समित्या | ग्रामपंचायती | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोकण | ६ | ८ | २३ | २ | ४ | ४५ | ३०१७ | ३१०५ |
| २ | नाशिक | ५ | ५ | ३६ | १ | ५ | ५४ | ४९०० | ५००६ |
| ३ | पुणे | ५ | ५ | ४१ | १ | ५ | ५७ | ५६८० | ५७९४ |
| ४ | औरंगाबाद | ८ | ४ | ५० | ३ | ८ | ७६ | ६६४४ | ६७९३ |
| ५ | अमरावती | ५ | २ | ४० | ० | ५ | ५६ | ३९५१ | ४०५९ |
| ६ | नागपूर | ६ | २ | २९ | ० | ६ | ६३ | ३७०४ | ३८१० |
| | एकूण... | ३५ | २६ | २१९ | ७ | ३३ | ३५१ | २७८९६ | २८५६७ |

## एकूण जागा व आरक्षण

*महानगरपालिका एकूण सदस्य संख्या २०११ च्या जनगणनेनुसार दर्शविली आहे.
आरक्षण २००१ च्या जनगणनेनुसार दर्शविण्यात आले आहे.

| स्थानिक स्वराज्य संस्था | एकूण जागा | एकूण महिलांच्या जागा | सर्वसाधारण | | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला |
| महानगरपालिका | २६१३ | १३१२ | १५८५ | ७८३ | २५१ | १३१ | ७० | ३७ | ७०७ | ३६१ |
| नगर परिषदा | ४७५६ | २३१३ | २६९५ | १३०३ | ५३२ | २५५ | २०६ | ९३ | १३२३ | ६६२ |
| नगर पंचायती | ११९ | ५८ | ६९ | ३४ | ११ | ५ | ४ | १ | ३५ | १८ |
| जिल्हा परिषदा | १९५५ | ९७८ | ९४८ | ४७४ | २१६ | १०८ | २६३ | १३२ | ५२८ | २६४ |
| पंचायत समित्या | ३९१० | १९५५ | १९४२ | ९७१ | ४२९ | २१४ | ५१६ | २५८ | १०२३ | ५१२ |
| ग्रामपंचायती | १९७३३८ | ९८६६९ | ९९३०४ | ४९६५२ | २१५३० | १०७६५ | २९४३२ | १४७१६ | ४७०७२ | २३५३६ |
| एकूण | २१०६९१ | १०५२८५ | १०६५४३ | ५३२१७ | २२९६९ | ११४७८ | ३०४९१ | १५२३७ | ५०६८८ | २५३५३ |

*महिलांसाठी दिलेल्या ५०% आरक्षणाच्या अनुषंगाने दर्शविलेली आकडेवारी

## भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३के नुसार राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र याची स्थापना : दिनांक- २३ एप्रिल, १९९४

## श्रीमती नीला सत्यनारायण, राज्य निवडणूक आयुक्त

### दिनांक- ६ जुलै, २००९ पासून कार्यरत

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | कार्यालयीन दूरध्वनी |
|---|---|---|
| १ | राज्य निवडणूक आयुक्त | ०२२-२२०२३४३७<br>०२२-२२०२६३२९ |
| २ | अपर मुख्य सचिव | ०२२-२२८४५९००<br>०२२-२२८४५११४ |
| ३ | उप सचिव | ०२२-२२०४५५८९ |
| ४ | उप आयुक्त | ०२२-२२०४५५८९ |
| ५ | अवर सचिव | ०२२-२२०२७७३७ |
| ६ | सहायक आयुक्त | ०२२-२२८८६९५० |
| ७ | लेखा अधिकारी | ०२२-२२८४६७२० |
| ८ | कक्ष अधिकारी (का-१)<br>मा.आयुक्त तसेच अपर मुख्य सचिव यांचे प्रशासनिक अधिकारी | ०२२-२२०४५०७५ |
| ९ | कक्ष अधिकारी (का-२) | ०२२-२२८४६७२० |
| १० | कक्ष अधिकारी (का-५) | ०२२-२२०४५०७५ |
| ११ | कक्ष अधिकारी (का-६) | ०२२-२२०४५०७५ |
| १२ | तहसिलदार (का-७) | ०२२-२२०४५०७५ |
| १३ | तहसिलदार (का-८) | ०२२-२२०४५०७५ |
| १४ | सांख्यिकी अधिकारी | ०२२-२२८४६७२० |
| १५ | सहायक संचालक (माहिती)<br>माहिती व जनसंपर्क अधिकारी | ०२२-२२८४६७२० |

कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक:- ०२२-२२८४६७२०
फॅक्स क्रमांक :- ०२२-२२८४६७१९ / ०२२-२२८४६७२१ / ०२२-२२०४६९०९


राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र
पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई:-४०० ०३२.
दूरध्वनी क्रमांक-०२२-२२८४ ६७२०, ०२२-२२०४ ५०७५, ०२२-२२०४ ५५८९;
फॅक्स. ०२२-२२०४ ६९०९/०२२-२२८४ ६७२१ / ०२२-२२८४ ६७१९
ई-मेल : stateelectioncommission@gmail.com
Web Site : www.mahasec.com